# ॥ चिमूटभर अंधाराचा स्वामी ॥

-प्रल्हाद जाधव

या एकांकिकेतील पात्रे :

पहिला
आणि
दुसरा

या एकांकिकेचा कोणत्याही माध्यमातील, कोणत्याही भाषेतील प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

(एक तरुण विमनस्कपणे उभा. दुसरा येतो. कुणाच्या तरी प्रतीक्षेत येरझारा घालू लागतो. कंटाळून पहिल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. लक्ष वेधण्यासाठी खाकरतो. टाळ्या वाजवत अहो शुक् शुक् इत्यादी करतो. पहिल्याचे अजिबात लक्ष नाही.)

दुसरा : (लांबूनच) माफ करा, जरा वाजले किती सांगता का ?
(पहिल्याचे अजून लक्ष नाही.)

दुसरा : (जरा मोठ्याने) शुक्, शुक्, अहो (बघतो) जरा वाजले किती सांगता का ?
(पहिला लक्ष देऊनही गप्प.)

दुसरा : कमाल आहे, बहिरा आहे की काय हा ? (अगदी जवळ जाऊन मोठ्याने) काय रे, जरा वाजले किती ते सांगतोस का ?

पहिला : (शांतपणे) ऐकू येतं मला.

दुसरा : येतं ना ? मग वाजले किती सांग !

पहिला : का म्हणून सांगू ?

दुसरा : अरेच्या! मग मघापासून इतका आटापिटा कशाला करतोय मी ?

पहिला : कुणी करायला सांगितला तुला आटापिटा ? मी ?

दुसरा : मग कुणी ?

पहिला : (जोर देत) ‘तिने’

दुसरा : ऑ?

पहिला : ‘ती’ येणार आहे ना ?

दुसरा : अरे, वेड्यासारखा काहीतरीच काय बडबडतोहेस? कोण ती ?

पहिला : ‘ती’ माहीत नाही ? कालिदासाने वर्णन केलेली ‘तन्वीश्यामा शिखरी दशना, पक्वबिंबाधरोष्ठी...’ श्यामल कांतीची, शुभ्र दंतपंक्ती असणारी, लांबसडक, मुलायम केशसंभार असणारी आणि यौवनाच्या ओझ्यामुळं जिची चाल मंदावलेली आहे अशी ती ?

दुसरा : अरे पण...

पहिला : अगदी अशीच नसली तरी गोबऱ्या गोबऱ्या गालाची, काळ्याभोर डोळ्यांची, सडसडीत बांध्याची, चार-चौघीत उठून दिसणारी अशीतरी असणारच ती... नाही म्हणजे असायलाच हवी. कारण ती आहे, असतेच ; सनातन आहे ती !

दुसरा : तुला हे नाही ते धंदे करायला कुणी सांगितलंय ?

पहिला : मी नाही करत नाही ते धंदे. तूच करतोहेस. नाहीतर अशा या आडवळणाच्या संकेतस्थळी आडवेळी तू आलाच असता कशाला ?

दुसरा : आडवेळी ? बापरे, म्हणजे वाजले तरी किती ? माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस अजून तू.

पहिला : पण मी का म्हणून उत्तर देऊ ?

दुसरा : एकतर तुझ्या हातावर घड्याळ आहे. दुसरारी गोष्ट म्हणजे या ठिकाणी तुझ्याशिवाय दुसरं चिटपाखरुदेखील नाही. आणि मुख्य म्हणजे याक्षणी वाजले किती हे जाणून घ्यावं असं मला वाटतं. मग तुझ्याशिवाय कुणाला विचारू मी ? काय चुकलं त्यात माझं ?

पहिला : (संताप) तू कितीही आव आणलास तरी वाजले किती हे सांगणार नाही मी. हातावर घड्याळ आहे हा माझा काही गुन्हा नाही. आणि मुख्य म्हणजे तुझ्या स्वत:च्या हातावरही घड्याळ आहे की, त्यात बघू शकतोस. समजलं !

दुसरा : (थोडा नरम) माझ्या हातावर जरी घड्याळ असलं तरी ते पुढं आहे की मागं आहे, हे समजून घेण्याचा अधिकार नाही का मला ?

पहिला : बरं समज, माझ्या घड्याळात आता नऊ झालेत आणि तुझ्या घड्याळात पावणेनऊ तर काय करणार तू ?

दुसरा : तर मी माझं घड्याळ पंधरा मिनिटं पुढं करीन.

पहिला : मग वेळ बरोबर येईल ?

दुसरा : अर्थातच.

पहिला : आणि समजा मीच माझं घड्याळ पंधरा मिनिटं मागं केल तर ? माझं घड्याळ बरोबर वेळ दाखवत असेल असं तुला का वाटतं ? तुझंच बरोबर नसेल कशावरून ?

दुसरा : अरे, पण तू जोपर्यंत वाजले किती हे सांगत नाहीस तोपर्यंत हा ताळा कसा काय करायचा ?

पहिला : ताळा ? अगदी सोपा आहे. आयुष्य वजा प्रेम गुणिले अंधार बरोबर वेळ. करून बघ. बाकी शून्य येते. म्हणून वेळ बरोबर शून्य !

दुसरा : उगाच नवकाव्यासारखं काहीतरी दुर्बोध आणि गूढ बोलू नको.

पहिला : दुर्बोध आणि गूढ असलं तरी ते एक सत्य आहे.

दुसरा : अरे पण त्यामागे काही तार्किक सुसंगती हवी की नको...

पहिला : आहे ना, तार्किक सुसंगतीही आहे... आपण ज्या वेळेवर नेहमी अवलंबून रहातो तिला क्रोनॉलॉजिकल टाईम असं म्हणतात. ही वेळ केवळ व्यवहारापुरतीच असते आणि आयुष्य म्हणजे केवळ व्यवहार नाही. त्यामुळे क्रोनॉलॉजिकल टाईम इज आऊट! दुसरी वेळ सत्याच्या अधिक जवळ जाणारी असते. तिला म्हणतात सायकालॉजिकल टाईम. मानसशास्त्रीय वेळ. ही सापेक्ष असते. एखाद्या घटनेच्या संदर्भात तुमच्या मनातील आंदोलनाचा जो वेग असतो त्यावर ती अवलंबून असते. उदाहरणार्थ, तू आता तिची वाट पहाताहेस, मुठीएवढं तुझं हृदय धाडधाड उडतंय, त्याची गती कमी–जास्त होतेय. आता तुझं संपूर्ण अस्तित्व केवळ त्या हृदयाचा एक ठोका झालंय आणि अशावेळी समज ती आली नाही, ठोका चुकला, थांबला, तर ? म्हणून वेळ बरोबर शून्य ! तशी ती येणार

नाहीच म्हणा...

दुसरा : (धावून जात) यू ब्लडी बास्टर्ड, आय विल किल यू ! शी कम्स. शी मस्ट कम !

पहिला : ओ नो...नो...नो माय यंगर ब्रदर, डोंट बी सो सेंटीमेंटल. ती येईल हा तुझा आशावाद अगदी ग्रिनिच येथील आंतरराष्ट्रीय प्रमाणवेळेइतकाच असत्य आहे. शी इज नॉट गोईंग टू कम ॲन्ड नेव्हर!

दुसरा : हे तुला कुणी सांगितलं?

पहिला : काय?... ती इथं येणार होती, पण आता येणार नाही हे ?

दुसरा : असं कोडं घातल्यासारखा बोलू नको. प्लीज... पण खरंच का ती येणार नाही आहे ? तुला कसं माहीत ?

पहिला : 'तो' म्हातारा भेटलेला दिसत नाही तुला ?...

दुसरा : कोण? कुठला म्हातारा? काय केलं त्यानं तिला ? बोल लवकर...

पहिला : 'तिला' तो काहीही करत नसतो. पण इथं येणाऱ्या प्रत्येकाला भेटतो. तो काय इकडेच येतोय. वाटल्यास त्यालाच विचार वाजले किती ते ! (म्हातारा येतो. म्हातारा म्हणजे पहिला तरुणच.)

दुसरा : अहो! वाजले किती हो तुमच्या घड्याळात ?

पहिला : आँ... काय म्हणालात ?

दुसरा : वाजले किती ? वाजले...

(पहिला हसायला लागतो)

दुसरा : हसायला काय झालं ?

पहिला : हसू नको तर काय करु ? म्हणे वाजले किती ? (पुन्हा हसतो.)

दुसरा : अहो, पण मी म्हणतो त्यात एवढं हसण्यासारखं काय आहे ? हातात घड्याळ आहे तुमच्या म्हणून विचारलं मी.

पहिला : घड्याळाचा आणि वेळेचा काहीही संबंध नसतो.

दुसरा : अहो, काय म्हणताय काय तुम्ही !

पहिला : अरे, यंत्रच ते शेवटी. चावीचा जोर असेपर्यंत पुढं पुढं सरकणार. चावी संपली की खेळ खलास. तुला गमंत वाटेल, पण पूर्वी मी घड्याळं दुरूस्त करण्याचं काम करीत असे. वेगवेगळ्या कंपन्यांची, बांधणीची, आकाराची कित्येक घड्याळं आजूबाजूला पडलेली असायची. एकच एक वेळ लावून त्या सर्वांना काबूत आणण्याचा आटोकाट प्रयत्न करायचो मी घड्याळं मागंपुढं व्हायची. मग प्रश्न पडायचा की कोणती वेळ खरी ? नाहीना सांगता येणार तुलाही ? (तो निरूत्तर) तेव्हापासून घड्याळाचा नाद सोडून दिला.

दुसरा : आणि मग ते हातातलं घड्याळ ?

पहिला : तेव्हापासून बंद पडलंय. किती वाजता बंद पडलंय सांगू ?

दुसरा : ओ! डोकं फिरायची वेळ आलीय.

पहिला : तो तरुणही भेटला होता वाटलं तुला ?

दुसरा : (उपहासाने) हो, भेटला होता ना !

पहिला : तरीही तू मला वाजले किती हे विचारलंस? फारच भित्रा दिसतोहेस !

दुसरा : भित्रा ?

पहिला : नाहीतर काय ?... वेळेला भिणारा.

दुसरा : माझ्या अगदी वर्मावर बोट ठेवलंत तुम्ही. माझे आजोबा फार वक्तशीर होते. त्यांच्या श्वासाबरहुकूम घड्याळाचे काटे फिरत. लोक त्यांच्या येण्याजाण्यावरून आपली घड्याळं लावत. वेळेच्या गैर वागलेलं त्यांना बिलकूल खपत नसे. पण मला ते पसंत नाही पडायचं. मी बंड करून उठायचो. त्यामुळं त्यांनी एक दिवस मला एक भयानक सत्य सांगितलं.

पहिला : आणि तू वेळेचा गुलाम झालास.

दुसरा : हो. एका संध्याकाळी असाच वेळेचं भान विसरून मी बागेत खेळत होतो. इतक्यात आजोबा आले...

(लहान होऊन चेंडू घेऊन खेळू लागतो. चेंडू उडवत उडवत एक फेरी मरतो आणि तो उंच फेकून झेलतो. इतक्यात त्याला आजोबा दिसतात. पहिला तरुण आजोबा. त्यांना बघून मुलगा चेंडू लपवण्याचा निरर्थक प्रयत्न करतो.)

पहिला : तुला किती वेळा सांगितलं की, सहानंतर खेळ बंद ?

(दुसरा गप्पच)

पहिला : अरे, काय विचारतोय मी ?

दुसरा : पण आजोबा, सहा कुठं वाजलेत अजून ?

पहिला : अस्सं ? सहा नाही वाजले मग किती वाजले ? त्या समोरच्या घड्याळात सहाचे ठोके पडलेले ऐकू आले नाहीत तुला ?

दुसरा : मला किनई आजोबा फक्त पाचच ठोके ऐकू आले.

पहिला : अस्सं, म्हणजे स्वत:च्या सोयीसाठी आता तू बहिरादेखील व्हायला शिकलास. चांगला बदडून काढला पाहिजे तुला. आण तो चेंडू इकडे. (मागे लागतो. अहो नको ना आजोबा इ. म्हणत मुलगा पळतो. पळापळी होते.) अरे-अरे-गधड्या-मला म्हाताऱ्याला पळायला लावतोस... थांब तुझी कणिकच तिंबतो चांगली. (पुन्हा मागे लागतो. 'अहो, नको ना आजोबा आम्ही नाही जा.' इ. म्हणत मुलगा त्यांना हुलकावण्या देण्याचा प्रयत्न करतो पण अखेरीस ते त्याला पकडतात.) आत्ता कसा सापडलास चोरा...आण तो चेंडू इकडे. (दुसरा देत नाही.)

पहिला : (धपाटा घालत) आण म्हणतो ना. (काढून घेतो. मुलगा रडू लागतो, पाय आपटत उभा राहतो.) रडू नको विनाकारण.

(दुसरा अधिक मोठ्याने रडू लागतो.)

पहिला : अरे रडू नको म्हणतो ना ?

(दुसऱ्याचे रडणे चालूच.)

पहिला : आत्ता गप्प बसतोस की घालू आणखी एक धपाटा ?

(दुसरा हळूहळू रडणे थाबवतो.)

पहिला : हे बघ. नसता हट्ट करु नकोस. घरी चल, शुभंकरोतीची वेळ होत आली.

दुसरा : (तक्रार करत) पण ती मुलं अजून कशी खेळताहेत. ती बघा !

पहिला : त्यांना खेळू दे. तुला मोठं व्हायचं ना ? मोठ्ठं व्हायचं असेल तर प्रत्येक गोष्ट अगदी वेळच्या वेळी करायला शिकलं पाहिजे. वेळ फुकट दवडू नये म्हणून तो नेपोलियन घोड्यावर बसल्या बसल्या झोप घ्यायचा.

दुसरा : एवढा मोठ्ठा होता त्याचा घोडा ?

पहिला : घोडा नाही रे गाढवा ! वक्तशिरपणाचा व्यासंग मोठा होता त्याचा. त्या नील आर्मस्ट्राँगला चंद्रावर पोहोचायला फक्त काही सेकंदाचा उशीर झाला होता पण तरी तिथून त्यांनं लोकांची माफी मागितली होती, हे लक्षात ठेव.

दुसरा : (ओरडत) आजोबा ऽऽऽ

पहिला : काय रे, ओरडायला काय झालं एकदम ?

दुसरा : ते बघा तिकडं...

पहिला : काय ते ?

दुसरा : फुलपाखरु.

पहिला : 'गाढवापुढं वाचली गीता' त्यातला प्रकार. तू आधी घरी चल बघू.

दुसरा : मी नाही येत. मी आधी फुलपाखरु पकडतो.

पहिला : अरे, पण शुभंकरोतीची वेळ...

दुसरा : नाही, मी आधी फुलपाखरु पकडणार. तुम्ही थांबा हं इथंच. अजिबात पुढं येऊ नका. (फुलपाखरु पकडण्याचा प्रयत्न करतो पण उडून ते दुसरीकडं बसतं.)

पहिला : गेलं ना उडून? काळाचंसुद्धा असंच असतं बाळा. आपल्याला चकवून पुढे पुढे निसटून जातो तो. आणि मग आपण म्हणतो, 'घटका गेली, पळे गेली तास वाजे ठणाणा. आयुष्याचा नाश होतो राम कारे म्हणाना.'

दुसरा : (तोवर पुन्हा फुलपाखराच्या मागे लागून ते पकडतो) सापडलं....

पहिला : काय सापडलं ?

दुसरा : फुलपाखरु ! बघा किती छान आहे आणि रंगपण बघा किती सुरेख...

पहिला : माझ्या बोलण्याकडं लक्ष नाही तुझं...

दुसरा : आणि माझ्याकडं तरी लक्ष कुठाय तुमचं ?

पहिला : काय म्हणालास गाढवा ? माझीच उलटतपासणी घ्यायला लागलास ? उलट बोलण्याइतकी अक्कल आली ना तुला ? मग आता मी काय सांगतो, ते नीट लक्ष देऊन ऐक आणि त्याची जाणीव ठेवता आली तर बघ... जन्माला

येतानासुद्धा थोडा उशीर केलास आणि आपल्या आयशीला भोवून बसलास.

दुसरा : आँ ?

पहिला : होय. वेळेवर जन्माला आला असतास तर तुझी आई जगली असती... (मुलाच्या हातून फुलपाखरु अभावितपणे सुटून जातं. त्याकडे शून्य नजरेने तो पहात राहतो.)

पहिला : आता सगळं काही समजतंय तुला म्हणून बोललो हे आज. बाकी तुझं कर्म तुझ्यापाशी... हं उठ बघू आता. उठ म्हणतो ना? हा घे तुझा चेंडू. (टाकतो. मुलगा झेलतो आणि फेकून देतो. त्याक्षणी 'मुलगा' पुन्हा तरुण, 'आजोबा' पुन्हा वृद्ध.)

पहिला : (हसत) तेव्हापासून तू वक्तशीरपणाचा पाईक बनलास नाही का ?
(दुसरा गप्पच.)

पहिला : मग आई भेटली का पुन्हा कधी ?
(क्रोध अनावर होऊन अंगावर धावून जाण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतो.)

पहिला : (रोखीत) शांत हो तरूणा, शांत हो. रक्त सळसळतंय तुझ्या अंगात पण त्यामुळं सारासार विकेकाचा मार्ग सुटतो. मी तुला वस्तुस्थितीच्या पातळीवर आणतोय.

दुसरा : मला माहीत आहे की एकदा गेलेलं माणूस परत येत नाही, पण आपल्या थोड्याशा चुकीमुळं दुसऱ्याचं आयुष्य धाब्यावर बसावं हेही पटणारं नाही.

पहिला : आणि म्हणूनच तू आपल्या प्रियतमेला ठरलेल्या वेळी भेटण्यासाठी तडफडतोहेस ?

दुसरा : मग काय चुकलं त्यात माझं ?

पहिला : 'ती' खरी असती तर काहीच चुकलं नसतं.

दुसरा : म्हणजे ? काय म्हणायचंय काय तुम्हाला ?

पहिला : वेळ जितकी खोटी असते, तितकीच 'तीही' खोटी...

दुसरा : माझं अगदी डोकं गरगरायला लागलंय तुमचं हे बोलणं ऐकून. तुमच्या लेखी वेळही खोटी आणि 'ती' ही खोटी. हो-हो तीही खोटी, की जिने माझ्या डोळ्यांच्या बाहुलीत आपली राहुटी उभारलीय. जी माझ्या श्वासोच्छ्वासात सामावली आहे. जिच्या पायातील पैंजणाची छुम छुम माझे प्राण तगवून ठेवते. ते पहा, ते पहा – ऐका ! तिच्या पायातील पैंजणाची छुमछुम...होय, नक्कीच ती येतेय...ती येतेय...
(पहिला हसत सुटतो.)

दुसरा : पुन्हा हसायला लागलात तुम्ही...

पहिला : कारण तू पुन्हा मूर्खपणा करायला लागलास !

दुसरा : तुम्ही मला शब्दांच्या जंजाळात अडकवताय. निरुत्तर करताय, पण अशानं

फसणार नाही मी. माझा विश्वास आहे स्वत:वर, तिच्यावर. मी वाट बघीन तिची. मला तुमच्या सल्याची गरज नाही.

पहिला : मी कधीही कुणाला सल्ला देत नाही. त्याला फक्त वस्तुस्थितीच्या पातळीवर आणतो इतकंच.

दुसरा : पण ते तरी का करता तुम्ही ?

पहिला : कारण? कारण श्वास आणि उच्छवास यांची जीवघेणी स्पर्धा म्हणजे जगणं. एकदा का दोहोतलं अंतर मिटलं, श्वासानं उच्छवासाच्या खांद्यावर हात टाकला की खेळ संपला. अंतिम उच्छवासाच्या ओलसर थरथरीतून चैतन्य संक्रात होत पंचत्वात विलीन होऊन जातं आणि मागं उरतं एक कलेवर ज्याच्या क्षणभंगूर लीलांसाठी आपण आयुष्यभर जीव पाखडत असतो. त्यात होणाऱ्या जखमांनी घायाळ होऊन कोणत्या तरी विराण झाडावर कण्हत बसतो. जिथून दिसतं आपलं आयुष्य मदाऱ्याच्या खेळातील माकडासारखं कोलांट्या उड्या मारताना आणि तोवर आपण जाणीवेच्याही पलीकडील एका अद्भूत संमोहनाचे बळी ठरलेले असतो. (म्हातारा हात फिरवतो. तरुण बेशुद्ध. त्याला मधोमध ठेवून त्याच्याभोवती एक रिंगण आखतो आणि डमरु वाजवत गोल गोल फिरू लागतो. आता तो 'मदारी' आणि तरुण 'बाबू')

पहिला : सुनो ! सुनो ! सुनो !
मेहरबानो सुनो,कदरदानो सुनो !
दिल लगानेवालो सुनो, दिल गवानेवालो सुनो !
देखो-देखो-देखो !
दिल-ए-बिमारीका करिश्मा देखो
जान-ए-दर्द का तमाशा देखो.
आँखे खोलकर देखना, कान खोलकर सुनना.
ए मेरे बाप,जरा हात की घडी खोलना
और दोनो पाव पे खडा रहना.
दो पाव होकर भी
एक पाव पे खडा रहेगा वो नामर्द
दोनो पाव पे खडा रहेगा वो हमदर्द !
अभी अपनी जगह छोडनी नहीं
थोडासाभी हिलना नहीं.
ये मेरे बच्चे के पेटपर लाथ मारके जायेगा
इसके मुहमें ये माटी डालेगा
इसका खून पिएगा,
उसको कसम दिल की, कसम प्यार की, कसम इश्क की !!

इश्क, इश्क, इश्क !
ये इश्क क्या होता है
इस इश्क में आदमी जानवर कैसे बनता है
आदमी पागल कैसे बनता है
जरा गौरसे सुनो (हाक मारत)
ए ऽऽऽ  बाबू ऽऽऽ

दुसरा : आय ऽऽऽ
पहिला : इधर आ.
दुसरा : आ गया.
पहिला : तू सोया है के जगा है ?
दुसरा : सोया है.
पहिला : तू सोया है ?
दुसरा : जी मैं सोया हूं.
पहिला : फिर बोलता कैसे है ?
दुसरा : निंदमें बोलता हूं.
पहिला : निंदमें क्यू बोलता है ?
दुसरा : निंदमें आदमी झूठ नही बोलता.
पहिला : शाबाश !
दुसरा : सच्चा बोलता है.
पहिला : है शाब्बाश !
दुसरा : कुछ छुपाता नहीं.
पहिला : तो तू अभी सच बोलेगा ?
दुसरा : हाँ.
पहिला : कुछ छुपाएगा नहीं...
दुसरा : नहीं...
पहिला : लोगों के बारेमें बताएगा ?
दुसरा : हां.
पहिला : अपने बारेमेंभी बताएगा ?
दुसरा : बेशक !
पहिला : फिर इधर आ.
दुसरा : आ गया.
पहिला : ये जनाब को देख ले.
दुसरा : देख लिया.
पहिला : इनकी सुरत कैसी है ?
दुसरा : रोनी है.

पहिला : क्यू रोनी है ?
दुसरा : ये जनाब बहुत दुखी है.
पहिला : क्यू दुखी है ?
दुसरा : इनकी बिवी भाग गयी है.
पहिला : क्यू भाग गयी है ? क्या ये कमजोर है ?
दुसरा : ये बदनके कमजोर नहीं मगर दिल के कमजोर है.
पहिला : ये कमजोरी क्या है ?
दुसरा : हदसे जादा दिल लगाना.
पहिला : तो उन्होने अपने बिवीसे हदसे जादा दिल लगाया था.
दुसरा : हां.
पहिला : तो क्या ये गलती है ?
दुसरा : जी, ये विश्वासघात का कारण है.
पहिला : इसकी कोई दवा भी है क्या ?
दुसरा : जी है.
पहिला : (लोकांना) सुना तुमने ? दिल की बिमारी की भी दवा... मगर उसके पहले (हाक मारत) ए बाबूऽऽऽ
दुसरा : आय ऽऽऽ
पहिला : जरा इधर आ.
दुसरा : आ गया.
पहिला : इस हिरोको देख ले.
दुसरा : देख लिया.
पहिला : इसके जेबमें क्या है ?
दुसरा : उसकी मेहबूबा का फोटो है.
पहिला : फोटो जेबमें क्यू रखा है ?
दुसरा : क्योंकी वो हमेशा पास रहे.
पहिला : तो क्या ये हिरो शादी करेंगे ?
दुसरा : ये शादी नहीं हो सकती.
पहिला : क्यू नहीं हो सकती ?
दुसरा : लडकी का बाप बीचमें आयेगा.
पहिला : क्यू ओयगा ?
दुसरा : उसको पैसा चाहिए.
पहिला : तो क्या इसके पास पैसा है ?
दुसरा : जी नही, मगर दिल है.
पहिला : तो ये शादी किसी और के साथ होगी क्या ?
दुसरा : ये भी शादी नहीं हो सकती.

पहिला : क्यू नहीं हो सकती ?

दुसरा : लडकी जान देनेवाली है.

पहिला : क्यूं जान देनेवाली है ?

दुसरा : उसके पेट में इसका बच्चा है.

पहिला : अरेरे! ये तो साला हिंदी फिल्म के माफक हो गया. इसकी भी कोई दवा है क्या ?

दुसरा : जी है.

पहिला : क्या है ?

दुसरा : तुमही बता दो.

पहिला : बता दूं ?

दुसरा : बता दो.

पहिला : ठीक है ! सुनो दिल लगानेवालो, दिल के मरीजो, हमदर्दो, हमसफरो, बुढो. नौजवानो, सुनो, सुनो, सुनो ! दिल के बिमारी की दवा. मगर उसके पहले (चक्कर मारत) एक दो रुपया, एक दो रुपया, एक दो रुपया... है कोई ? कोई बात नहीं. एक एक रुपया, एक रूपया, एक रुपया, एक रुपया... कोई भी नहीं? एक आठ आना, एक आठ आना... (हाक मारत) ए बाबू ऽऽ

दुसरा : आय ऽऽऽ

पहिला : पैसा तो कोई भी नहीं देता...

दुसरा : फिर ये दवा मुझे बता दे...

पहिला : क्यूं बता दू ?

दुसरा : क्यों की मैं भी प्यार करता हूं.

पहिला : लडके से करता है, यसा लडकी से ?

दुसरा : लडकीसे.

पहिला : ओ क्या करती है ?

दुसरा : कॉलेजमें पढती है.

पहिला : तो क्या कॉलेज की चक्कर मारेंगे ?

दुसरा : जी, मारेंगे

पहिला : (डमरू वाजवत एक चक्कर मरतो) ये आ गया कॉलेज.

दुसरा : आ गया.

पहिला : अभी देख ले वो किधर है...

दुसरा : गार्डनमें है.

पहिला : साथमें कौन है ?

दुसरा : एक नौजवान उसके साथ बैठा है.

पहिला : वो क्या कर रहे है ?

(हा प्रश्न विचारत रहातो. उत्तर देणे अशक्य असल्याने दुसरा तरूण

नकारार्थी मान हलवतो. हळूहळू बेभान होऊन तळमळायला, तडफडायला लागतो. त्याच्या भोवती फिरत)

पहिला : ये आ गया.
देखो भाईयों, डरनेकी कोई बात नहीं
अपनी अपनी जगह छोडनी नहीं
इसको बोलते है इश्क का मारा
दिलका मारा, प्यार का मारा
एक बार ये भूत सवार हो जाय
तो खाना खराब, निंद हराम
काम पे दिल लगता नहीं,
खाने का बदनपे असर नहीं
पैसे को पैसा नहीं मिलता
पानी को पानी नहीं मिलता
दिमाग में शैतान घुसता है
जो दिल की तोडफोड करता है
फिर ये सैतान के बच्चे पागल बनते है
रात बेरात बेहया भटकते है
इनके अंदर का जानवर अगर जगे
तो उसके सामने खैरियत नहीं
किसी के माँ की, बेटी की, बहु की !
थू... तेरे करम को
सुन मेरी इलाजको
तू अपना दिल निकाल दे
किसी पेडपे टांग दे,
फिर बैठ प्यारी की पीठपर
सात समुंदर पार कर.
(तरूण संमोहनातून बाहेर येतो. बाबूचा पुन्हा तरुण तर मदाऱ्याचा पुन्हा वृद्ध झालेला. तरूण असहाय्यपणे वृद्धाच्या पायावर कोसळतो. त्याच्या पाठीवरून हात फिरवत)

पहिला : पोरा! तुझी ही तडफड पाहून जीव तीळ-तीळ तुटतो. आता अधिक फडफडाट करु नकोस. नाहीतर तुझ्यातील भाबड्या प्रांजळपणासाठी माझ्या मनातील एक अंधारा कोपरा उजळून टाकण्याचा मोह होईल मला. माझे म्हाताऱ्याचे चार शब्द ऐक. ते पटायला हवेत तुला. (तरुण आता भारावलेल्या अवस्थेत उभा.)... ती म्हणजे असतो केवळ एक भ्रम. जो काळाच्या गर्द धुक्यात होत जातो अधिकाअधिक गडद. साकळत जातो

रक्तासारखा... आणि त्यात आपण कुठंच नसतो. आपण म्हणतो की जगलो एक सुंदर स्वप्न, लढलो, भूषवली पदं, प्रेम केलं, लिहिलं, वाचलं, भोग घेतला, जन्माला घातलं... पण हे असतं केवळ अंधाऱ्या तळघरात शिरण्यासारखं. जिथं सगळीकडे सर्वकाळ असतं केवळ अंधाराचंच साम्राज्य, आणि विशेष म्हणजे आपल्या वाट्याला येतो तो अंधार देखील चिमूटभरच. आपण असतो चिमूटभर अंधाराचे स्वामी. केवळ चिमूटभर अंधाराचे. (संपता संपता पुन्हा तरुण होतो)

दुसरा : मला न्याल तुमच्याबरोबर ?

पहिला : कुठं ? (आता तो वृद्ध नसून पुन्हा तरुण)

दुसरा : तू कधी आलास इथं... आणि तो म्हातारा कुठ गेला ?

पहिला : तो म्हातारा विरून गेला, वाऱ्याच्या लहरीबरोबर आसमंतात.

दुसरा : पण मला तर त्याच्याबरोबर जायचं होतं...

पहिला : कुठं ?

दुसरा : मूठभर अंधारातून चिमूटभर अंधारात...

पहिला : आणि मग तिचं काय होईल ?

दुसरा : कोण ती ?

पहिला : 'ती' माहीत नाही ? कालिदासानं वर्णन केलेली, 'तन्वीश्यामा शिखरी दशना पक्वबिंबाधरोष्ठि मध्येशामा चकित हरिणी.... '

दुसरा : ओ स्टॉप इट... इटस् ऑल नॉनसेन्स... कमॉन जॉईन मी, आपण त्या म्हाताऱ्याला शोधू...

पहिला : मी इथंच थांबेन !

दुसरा : कशासाठी ?

पहिला : 'ती' येणार आहे...

दुसरा : किती वर्ष वाट बघतोहेस ?

पहिला : माय सेन्स ऑफ टाईम इज ॲबसेन्ट.

दुसरा : तरीही वाट बघतोहेस ?

पहिला : म्हणूनच बघतोय! ऐक! तुला ऐकू येतो काही आवाज ? तिच्या पायातील पैंजणांची छुमछुम ? होय, नक्कीच ती येतेय... नक्कीच !

दुसरा : (त्या आवाजाच्या दिशेने पाहतो. दुसरा आवाक्. दोघेही फ्रीज. पडदा.)

*****